महाराष्ट्र शासन

वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पुर्व) मुंबई-४०००६६

विधी सल्लागार पद कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत.

वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली या कार्यालयासाठी जमिन विषयक, आस्थापना विषयक, वनगुन्हे, मजूरांचे न्यायालयीन प्रकरणे तसेच इतर न्यायालयीन सर्व प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी एक विधी सल्लागाराची कंत्राटी पध्दतीने नेमणुक करावयाची आहे. त्यासाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव व ईतर पात्रता धारण करणारे इच्छुक उमेदवार / सेवानिवृत्त विधी व न्याय अधिकारी / वकील यांनी दिनांक २६/०३/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालयात विहित नमुण्यात अर्ज सादर करावेत.

| | |
|---|---|
| पद | विधी सल्लागार |
| पदसंख्या | ०१ |
| मानधन | रु. ५०,०००/- (पन्नास हजार रुपये मात्र) दरमहा प्रमाणे |
| पात्रता | १) उमेदवार सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश / अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश / प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी असावा. असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर कोणत्याही शासकिय संस्था किंवा सार्वजनिक उपक्रमासाठी विधी सल्लागार म्हणून किमान २० वर्षाचा अनुभव असलेला असावा. उपरोक्त दोन्ही श्रेणीचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर प्रथम दंडाधिकारी आणि त्यापेक्षा वरीष्ठ नायालयात / कामगार न्यायालयात किंवा औद्योगिक न्यायालयात अभियोक्ता म्हणून फौजदारी, दिवाणी, आस्थापना विषयक किंवा यथास्थितीत कामगार विषयक प्रकरणे किमान १० वर्ष हाताळणा-या उमेदवाराचा विचार करता येईल.<br>२) उमेदवार वनविषयक, फौजदारी, दिवाणी विषयक, सेवा व आस्थापना विषयक तसेच कामगार विषयक बाबीत ज्ञानसंपन्न असेल.<br>३) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. |
| | सविस्तर तपशील खाली नमुद वेबसाईटवर पाहाते |

ही शासकिय नोकरी नसून, केवळ कंत्राटी पध्दतीवर ११ महिन्याच्या करारावर नेमणुक आहे.

शैक्षणिक अर्हता व अनुभव, कर्तव्य जबाबदारी, मानधन नियुक्ती कालावधी, अर्जाचा नमुना, निवडीची पध्दत इ. सविस्तर तपशील वनविभागाच्या www.mahaforest.gov.in व http:/ sgnpmaharashtra gov.in या वेबपेजवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशिल पाहुन अर्ज करावे.

(जी. मल्लिकार्जुन)
वनसंरक्षक व संचालक
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

ठिकाण :- बोरीवली
दिनांक :-०९ /०३/२०२१

## वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालय

### कंत्राटी पध्दतीवर विधी सल्लागार नियुक्ती करीता सविस्तर सुचना
### विधी सल्लगार पद संख्या - १

वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व) मुंबई या कार्यालयासाठी जमिन विषयक, वनगुन्हे व आस्थापना विषयक न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजु प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने पाठपुरावा करुन निपटारा करण्यासाठी १ (एक) विधी सल्लागाराची कंत्राटी पध्दतीवर नेमणुक करावयाची आहे. त्यासाठी खालील प्रमाणे किमान शैक्षणिक, अनुभव व इतर पात्रता धारण करणारे इच्छुक उमेदवार / सेवानिवृत्त विधी व न्याय सल्लागारांनी अर्ज करावेत.

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

१. मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायदयाचा पदविधर व सनदधारक

२. सेवानिवृत्त जिल्हान्यायाधिश / अतिरिक्त जिल्हा किंवा सार्वजनिक उपक्रमामध्ये विधी कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी किंवा सरकारी किंवा सार्वजनिक उपक्रमामध्ये विधी सल्लागार म्हणुन २० वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेले उमेदवारांना प्राधान्य राहिल व असे उमेदवार उपलबध झाले नाहीत तर किमान ७ वर्षापासुन वकिली व्यवसाय करत असलेल्या उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

३. असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी आणि त्यापेक्षा वरिष्ठ न्यायालयात / कामगार न्यायालयात किंवा औदयोगिक न्यायालयात अभियोक्ता म्हणून फौजदारी,. दिवाणी, आस्थापना विषयक किंवा यथास्थितीत कामगार विषयक प्रकरणे किमान १० वर्षे हाताळणा-या उमेद वारांचा विचार करता येईल.

४.उमेदवार वन विषयक, फौजदारी व दिवाणी विषयक, सेवा व आस्थापना तसेच कामगार विषयक बाबींत ज्ञानसंपन्न असावा.

५. उमेदवारास मराठी, इंगजी व हिंदी भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.

**कर्तव्ये व जबाबदा-या :**

१. संबंधित वन अधिका-यांकडून विधी विषयक सल्ला देण्याबाबत लेखी स्वरुपात संदर्भ प्राप्त झाल्यावर त्यांना लेखी स्वरुपात सल्ला देणे.
२. वनगुन्हे प्रकरणी आरोपींना ताब्यात घेणे बाबत न्यायालयाकडुन आवश्यक कालावधी वाढवून घेणे.
३. सरकारी वकिल यांच्याशी समन्वय साधुन त्यांच्या अनुपस्थितीत न्यायालयास विभागाच्या वतीने म्हणणे सादर करणे / बाजू मांडणे.
४. वनविभागाच्या जुन्या न्यायालयीन प्रकरणी आढावा व पाठपुरावा करणे व यासाठी आवश्यक ती सरकारी वकीलाची मदत घेणे.
५.वनविभागांच्या वतीने न्यायालयात प्रतिज्ञापत्र, परिच्छेद निहाय उत्तर दाखल करणे व कायदे विषयक सल्ला देणे.
६. मुंबई / मुंबई उपनगर / ठाणे या जिल्हयातील तालुका व जिल्हा न्यायालयामध्ये व इतर न्यायाधिकरणापुढे वनविभागांच्या वतीने बाजु मांडणे.
७. वनविभागाशी निगडीत असलेल्या वनविभागाने दाखल केलेल्या व त्यामध्ये आरोपी असलेल्या कोणत्याही प्रकरणी खाजगी वकिल पत्र घेता येणार नाही.
८. वन विभागातर्फे दाखल करावयाचे परिच्छेदनिहाय अभिप्राय / शपथ पत्राचे प्रारुप हे कायदेशिरदृष्टया बरोबर आहे किंवा कसे, याबाबत संबंधित वन अधिका-यांकडून संदर्भ प्राप्त झाल्यावर संबंधित वन अधिका-यांनी तयार केलेल्या प्रारुपाची छाननी / तपासणी करुन आवश्यकतेनुसार सुधारणा करणे.
९. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे तसेच न्यायालयीन प्रकरणाच्या अद्यावत स्थितीबाबत संबंधित वन अधिका-यांना वेळोवेळी लेखी अवगत करणे.
१०. शासनाच्या विरोधात न्यायालयीन निकाल लागल्यास, अपील / पुनर्विलोकनाची प्रक्रिया वेळीच व्हावी, याबाबत दक्षता घेणे.
११. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.
१२. करारनाम्याच्या कालावधीत विधी सल्लागार हा वन विभागाच्या विरोधातील कोणतेही प्रकरण हाताळणार नाही.
१३. वनविभागाच्या वतीने न्यायालयात प्रतिज्ञापत्र, परिच्छेद निहाय उत्तर दाखल करणे, व कायदे विषयक सल्ला देणे.
१४. सर्व न्यायालयीन प्रकरणासाठी विभागीय स्तरावर नोडल ऑफिसर म्हणून काम पहाणे.
१५. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
१६. संबंधित वनविभागाचे कार्यालय त्यांच्या कार्यक्षेत्राशी निगडीत वनवृत्ता पासून लांब आहेत, त्यांनी जवळच्या वनवृत्ताअंतर्गत विधी सल्लागारांची सेवा प्राप्त करण्याची मुभा राहिल. त्यासाठी संबंधित विधी सल्लागारांना कोणतेही अतिरिक्त शुल्क / भत्ता देय राहणार नाही.
१७. उमेदवार वन विभागाच्या आस्थापना विषयक बाबी, न्यायालयीन प्रकरणाविषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशा इत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षतमतेने पार पाडू शकेल.
१८. सरकारी वकिल / सहायक सरकारी वकील यांच्या अनुपस्थितीत न्यायालयात विभागाच्या वतीने म्हणणे सादर करणे / बाजू मांडणे.
१९. वनविभागाच्या सर्व न्यायालयीन प्रकरणी पुर्ण वेळ देणे बंधनकारक राहील.
२०. उमेदवाराचे मुख्यालय बोरीवली येथे राहील.

**मानधन :** दरमहा रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) एक विधी सल्लागार
**नियुक्ती कालावधी :**

१. सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यांनेतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत ११ महिन्यापेक्षा अधिक असणार नाही याची काळजी सक्षम प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवारंची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे सक्षम प्राधिका-यांचे मत झाल्यास, त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.
२. सदर पदाची नेमणुक ही पूर्ण कंत्राटी पध्दतीने असेल. हे विधी सल्लागार शासकिय सेवक म्हणून गणले जाणार नाहीत. त्यांची नियुक्ती झालेनंतर त्यांना योग्य नमुन्याती करारपत्र वनविभागाशी करणे बंधकारक राहिल. **करारपत्रासाठी येणारा खर्च उमेदवाराने करावयाचे आहे.**

**अर्जाचा नमुना :**

वनविभागाच्या www.mahaforest.gov.in/ http:/ sgnpmaharashtra gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर नमुना डाऊनलोड करुन त्यातील नमुद बाबी व इतर अतिरिक्त बाबींसह सविस्तर तपशिलासह उमेदवाराने अर्ज खालील पत्त्यावर दिनांक २६/०३/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा रितीने सादर करावेत. त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्जासोबत कोणतेही मुळ कागदपत्र अथवा छायांकित प्रति जोडावयाच्या नाहीत. अर्ज पोष्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करता येईल.

**अर्ज करावयाचा पत्ता :**

वनसंरक्षक व संचालक
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली (पुर्व) मुंबई ४०००६६.

**अर्जाची फी :**

अर्ज करण्याकरीता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात आलेले नाही.

**निवड करावयाची पध्दत :**

१. प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची व अर्जातील माहितीची छाननी करुन त्यामधुन निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना मुलाखातीसाठी बोरीवली, मुंबई येथे वरील पत्यावर बोलाविण्यात येईल.

२. मुलाखातीचे वेळी सर्व मुळ कागदपत्रे व त्यांची एक झेरॉक्स प्रत सह उपस्थित राहावयाचे आहे.

३. मुलाखती बाबत दिनांक, वेळ व ठिकाण इत्यादी वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. किंवा उमेदवाराने अर्जामध्ये नमुद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर कळविण्यात येईल.

४. निवडीबाबत कोणत्याही प्रकारचा स्वतंत्रपणे पत्रव्यावहार करण्यांत येणार नाही. आवश्यक सुचना वेबसाईटवर जाहिर करण्यात येतील.

प्राप्त अर्जामधुन प्राथमिक निवड यादी करणे, निवडीच्या कार्यपध्दतीमध्ये बदल किंवा सुधारणा करणे अनुभवाचा प्राधान्यक्रम ठरविणे, कर्तव्य व जबाबदा-यांमध्ये वाढ करणे इत्यादी आपले मुलाखात व निवडीबाबत किंवा पुर्ण प्रक्रिया रद्ध करण्याचे संपूर्ण अधिकार अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समितीस असतील.

(जी. मल्लिकार्जुन)
वनसंरक्षक व संचालक
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

**अर्जाचा नमुना**

**वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली पूर्व यांचे कार्यालय**

कंत्राटी तत्वावर विधी सल्लागाराची नियुक्ती करीता अर्जाचा नमुना

| फोटो |
|---|
| |

१. अर्जदारोचे संपूर्ण नांव (मराठी) :-

२. अर्जदाराचे संपूर्ण नाव (इंग्रजी) (Capital letter):-

३. संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक :-

४. पत्ता :-

५. जन्म तारीख :-

६. शैक्षणिक अर्हता :-
- अ) कायदेविषयक अर्हता :
- ब) सनद क्रमांक व दिनांक :
- क) सनद जारी करणारे प्राधिकरण :

७. अनुभव :-
- अ) सेवानिवृत्त अधिकारी असल्यास सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद
- ब) एकुण सेवेचा कालावधी (वर्ष)
- क) सेवानिवृत्तीचा दिनांक
- ड) सेवाकालावधीत कार्यरत असलेल्या पदाचा तपशिल

| अ.क्र. | पदनाम | सेवाकालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

- इ) विधी व्यवसायी (वकिली) असल्यास व्यवसाय सुरु केल्याचा दिनांक
- फ) विधी व्यवसायी (वकिली) अनुभवाचा कालावधी
- ग) विधी व्यवसायी असल्यास त्याबाबतची संक्षिप्त टिप्पणी ठिकाणांसह.

८) इतर पुरवणी माहिती :-

अर्जदाराची स्वाक्षरी व दिनांक

**प्रमाणपत्र**

मी याव्दारे प्रमाणीत करतो / करते की, अर्जामध्ये नमुद केलेली माझी माहिती ही पुर्णपणे खरी आहे. माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास प्रक्रियेमधुन वगळण्यास पात्र राहीन.

दिनांक : स्वाक्षरी

स्थळ : नांव